क्रमांक विभुसं-५/एस. आर. ९२/८७
विशेष भूमि संपादन अधिकारी
नं. ५ सांगली यांचे कार्यालय
महसूल भवन, मिरज.

तारीख - ९३/७/९८

# अंतिम - निवाडा

## निवाड्याचे शिर्षक

नळपाणीपुरवठा योजना कापरी साठी मौजे (कापरी) शिराळा

तालुका शिराळा जि. सांगली येथील जमिनीचे संपादन

२) भूसंपादन कायदा १८९४ व दुरूस्त कायदा १९८४ कलम ४ व ६ चे अधिसूचनेचा तपशील

अ) कलम ४ ची अधिसूचना महाराष्ट्र महाराष्ट्र शासनाचे राजपत्रात तारीख ८/५/९८ रोजी पान नं ६२८

वर क्रमांक विभूस - ५ / एस. आर. ९२/८७ दिनांक २३/७/९८ अन्वये प्रसिद्ध झाली.

ब) स्थानिक वृत्तपत्रात मराठी भाषेमध्ये खालीलप्रमाणे प्रसिद्धी दिली.

| वृत्तपत्राचे नांव | प्रसिद्धीची तारीख |
|---|---|
| १) दैनिक प्रतिध्वनी | ६/५/९८ |
| २) दैनिक राष्ट्रध्वनी | २४/५/९८ |

क) अधिसूचनेचा मतितार्थ जाहिरीत्या स्थानिक सोईस्कर ठिकाणी प्रसिद्ध केला त्याचा तपशील

| ठिकाण | | प्रसिद्धीची तारीख |
|---|---|---|
| १) तहसिल कार्यालय | शिराळा | १८/६/९८ |
| २) मौजे | कापरी गांवचे नोटीस बोर्डावर | १८/६/९८ |

३) कलम ६ चे अधिसूचनेचा तपशील

अ) कलम ६ ची अधिसूचना महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यपत्रात पान नं. २०७५/२०७६ येथे दि. ६/११/९८

रोजी क्रमांक भूस/आरओआर/२१६१६/९८ ने प्रसिद्ध झाली आहे.

ब) स्थानिक वृत्तपत्रात मराठीतून प्रसिद्ध दिलेचा तपशील.

| वृत्तपत्राचे नांव | प्रसिद्धीची तारीख |
|---|---|
| १) दैनिक तरुणभारत | |
| २) | |

क) अधिसुचनेचा मतितार्थ जाहिरित्या स्थानिक सोईस्कर ठिकाणी प्रसिद्ध केला त्याचा तपशील.

| ठिकाण | | प्रसिद्धीची तारीख |
|---|---|---|
| १) तहशील कार्यालय. | शिराळा | १८/१/९८ |
| २) मौजे | शिराळा गावचे नोटीस बोर्डावर | १५/१/९८ |

# निवाडयाची कारणे

कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग सांगली. यांनी संपादन मंडळ या नात्याने

यांचेकडील पत्र क्र. चिशा/भूसं/१२५/२१ दि. ८/३/९१ ने गाव शिराळ (कापरी) तालुका शिराळ

जि. सांगली येथील जमिनी नळपाणी पुरवठा योजना कापरी साठी

संपादन कराव्यात म्हणून प्रस्ताव क्र. चिशा/भूसं/१२५/२१ दिनांक ८/३/९१

ने पाठविला

सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी सांगली यांनी त्यांचेकडील नंबर क्र. भूसंपादन/कावि/एसआर/१/२९१ — एसआर ४२/९१

दिनांक १६/३/९१ ने विशेष भूमि संपादन अधिकारी नं. ५ सांगली यांचेकडे भूसंपादनाची कार्यवाही करावी म्हणून पाठविला. प्रस्तावामध्ये भूसंपादनासाठी दाखविलेले कारण सार्वजनिक जनतेच्या हितासाठी आहे. म्हणून सार्वजनिक हितासाठी भूसंपादन करणे गरजेचे व निकडीचे आहे.

आयुक्त, पुणे, विभाग पुणे यानी त्यांचेकडील भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसूचना नं. भूसं/बि/कावि २-बी ६/९० ने महाराष्ट्र राज्याचे राजपत्रात पुणे विभागातून पान नं. २०७५, २०७६ दि. ६/११/९० रोजी.

दिनांक ३०/११/९० ने प्रसिद्ध केली. सदर अधिसूचनाद्वारे असे जाहीर केले आहे की, अधिसूचनेच्या सूचित

जाहीर केलेल्या जमिनी ह्या नळपाणीपुरवठा योजना कापरी साठी संपादन करणे जरुर आहे

आणि विशेष भूमि संपादन अधिकारी नं. ५ सांगली यांची भूसंपादन कायदा १८९४ कलम ३ 'क' अन्वये नेमणूक केली असुन त्यांना जिल्हाधिकारी यांचे भूसंपादनाचे कामी कारवाई करणेचे अधिकार प्रदान केले आहेत. म्हणून विशेष भूमी संपादन अधिकारी नं. ५ सांगली हे उक्त जमिनीचे संपादन करणेसाठी कराबी लागणारी कार्यवाही करणेस समक्ष आहेत. सदर भूसंपादन कायदा कलम ७ प्रमाणे भूसंपादन अधिकारी हे समक्ष आहेत.

४) अंतिमरित्या संपादनासाठी सुचित केलेल्या जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे

गाव मौजे शिराळ (वारी) तालुका शिराळ जिल्हा सांगली येथील जमिन

| अ. नं. | सर्व्हे नंबर/गट नंबर | संपादनाचे क्षेत्र | | दर हेक्टरी आकार | आकारानुसार गट |
|---|---|---|---|---|---|
| | | संपादनक्षेत्र | आकार | दर हेक्टरी आकार | |
| १) | ग.नं. ९५/१अ | ०-०३ | ०-१८ | ६-०० | ५ बागायत |
| २) | ग.नं. ९६ | ०-०१ | ०-०३ | ३-८१ | ४ जिरायत |

भूसंपादनाखाली असलेल्या जमिनीची सयुक्त मोजणी अप्पर जिल्हा निरिक्षक, भूमि अभिलेख व संपादन मंडळाचे प्रतिनिधी यांच्या समक्ष करणेत आली आहे मोजणीचा निष्कर्ष मोजणी पत्रक व संयुक्त मोजणी दाखल्यात नमूद केला आहे. कोणत्याही हितसंबंधी इसमाने अशा तऱ्हेने मोजणी केलेल्या जमिनीचे क्षेत्रफळाविषयी आक्षप घेतले नाहीत म्हणून सपादित जमिनीचे संयुक्त मोजणी दाखल्यामध्ये दाखविलेले क्षेत्र हेच सपादनखालील जमिनीचे खरे क्षेत्रफळ आहे असे नुकसान भरपाई देतविताना विचारात घेतले आहें. शिवाय सदरचे क्षेत्र गा. न. नं. ७/१२ मध्य दाखबिले क्षेत्राची मिळते जुळते आहें.

३) भूसंपादन कायदा कलम ६ ची अधिसूचना प्रसिद्ध झालेनंतर भूसंपादन कायदा कलम ९ (१) (२) ची जाहीर नोटीस भूसंपादन कार्यालय गावची चावडी तहसिल कार्यालय व संपादित जमिनीवर व जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रसिद्ध केली त्याचप्रमाणे सदर कायद्याचे कलम ९ (३) (४) प्रमाणे हितसंबंधी इसमाना वैयक्तिक नोटीसा बजावल्या. सदर नोटीसाद्वारे त्यांना संपादित जमिनीचे नुकसान भरपाईचे हक्कासंबंधी सदर कायद्याचे कलम ८ प्रमाणे केले मोजनीबाबत अगर अन्य हक्काबद्दल जर काही आक्षेप व हरकती असल्यास त्या द्याव्यात. नेमले तारखेस नोटीसा बजावुन हितसंबधी इसमानी आपल्या हरकती-आक्षेप दिले नाहीत.

कोणाही खातेदाराने नोटिसा दिलेनंतर प्रस्तावित भूसंपादनाविषयी आपले आक्षेप सादर केले नाहीत.

## मालकी हक्क

संपादन खालील जमिनीच्या७/१२ हक्क नोंदणीमध्ये दाखविलेल्या नोंदी ह्या मालकी हक्क ठरविणेबाबत प्रमाणभूत धरणेत आल्या आहेत. मालकी हक्कासंबधी कोणताही वादविवाद अगर तक्रार नाही.

## संपादनाखालील जमिनीचे ठिकाण व वर्णन

सन १९९१ चे जनगणनेनुसार गावची लोकसंख्या इतकी आहे. गांव नमुना नं. १ मध्ये जमिनीचा कमाल आकार खालीलप्रमाणे नोंदला आहे.

१) जिरायत जमिन रुपये – 8-५
२) बागायत जमिन रुपये – २०-९६
३) तरी जमिन रुपये –

# जमिनीची प्रत

संपादनाखालील जमिनीचा आकार, जमिनीची प्रत व उत्पादन क्षमता विचारात घेऊन गावचे आकाराप्रमाणे खालील गट करणेत आले आहे.

| अ. नं. | आकाराप्रमाणे गट | आकार ७/८ |
|---|---|---|
| १) | 0-09 ते 9-24 | 9 |
| २) | 9-२६ ते 2-40 | 2 |
| ३) | 2-49 ते 3-40 | 3 |
| ४) | 3-49 ते 4-00 | 8 |
| ५) | 4-09 ते 6-40 | 4 |
| ६) | 6-49 ते 90-00 | ६ |
| ७) | 90-09 ते 92-40 | 6 |
| ८) | 92-40 चे पुढील सर्व | ८ |

पोट खराब

—

हक्क

—

हक्कासाठी पुरव पुरावा

—

हितसंबंधी इसमानी जे भूसंपादन कायदा कलम ९ चे चौकशीचेवेळी हजर होते त्यांनी संपादनाखालील जमिनीचे किमतीबद्दल कोणताही पुरावा हजर केला नाही.

—

# संपादन मंडळाचा पुरावा

संपादन मंडळाने संपादनाखालील जमिनीचे किमतीबद्दल कोणताही पुरावा हजर केला नाही.

## संपादनाखालील जमिनीचे पंचानुमते किमत

## संपादनाखालील जमिनीचे मूल्यांकन

संपादनाखालील जमिनीचे मूल्यांकन ठरविणेची तारीख म्हणजे भूसंपादन कायदा कलम ४ अन्वये काढलेली अधिसूचना अंतिमरित्या ज्या तारखेस प्रसिद्ध झाली ती धरुन त्या तारखेस मूल्यांकन करणेचे आहे, या कामी सदर अधिसूचना अंतिमरित्या तारीख १७/४/८८ रोजी प्रसिद्ध झाली आहे. म्हणजे तारीख १७/४/८८ रोजी संपादनाखाली जमिनी मूल्य काय होते हे ठरविणचे आहे सदरचे मूल्य ठरविण्याचे प्रकार १) संपादनाखालील जमिनीचे विक्रीवरुन २) संपादनाखालील जमिनीचे आसपास लगत असलेल्या जमिनीचे किमत ठरविण्याचे तारखेपूर्वी ३ ते ५ वर्षांमध्ये झालेले खरेदी विक्रीचे व्यवहारावरुन व ३) संपादनाखालील जमिनीचे येणारे उत्पादनावरुन संपादनाखाली जमिनीचे आकारमान गटामधील जमिनीचे मूल्य ठरविणेचे तारखेपूर्वी लगत व त्याच प्रतीच्या गटातील ३ ते ५ वर्षात झालेले खरेदी–विक्रीच्या व्यवहाराचे पत्रक सोबत जोडले आहे.

मौजे छिपळी हे गाव तालुक्याचे ठिकाण असून जिल्ह्यापासून ६३ कि.मी. अंतरावर आहे. गावी प्राथमीक, माध्यमीक व उच्च माध्यमीक शाळा व महाविद्यालय इत्यादी शैक्षणीक सोयी आहेत.

क्रमाप →

गावी सरकारी दवाखाना खाजगी दवाखाना पाणीपुरवठा योजना विजपुरवठा वडापकीची सोय, गावी ग्रामपंचायत, सेवा सोसायट्या-४ दुधसंकलन सोसायट्या-२, पोष्ट ऑफीस सार्वजनिक वाचनालय दुरध्वनी सोय पतपेढी बँक इत्यादी सुख सुविधा उपलब्ध आहेत.

संपादनाच्या जमिनीपैकी ग.नं. ९६ ची जमिन जिरायत स्वरुपाची असून ग.नं. $\frac{९४}{१-अ}$ ची जमिन हंगामी बागायत स्वरुपाची आहे. सदरच्या जमिनीचे मुल्यांकन ठरविणे कामी गावचे मुल्यांकन तारखे पुर्वीचे एकुण -१३ खरेदी विक्रीचे व्यवहार उपलब्ध आहेत.

ग्रुप क्र.४ — ग.नं. ९६ ची संपादनाची जमिन जिरायत प्रकारात मोडत असून सदर जमिनीचे मुल्यांकन ठरविणेकामी अ.नं. ६ चा फक्त एकच खरेदी-विक्रीचा व्यवहार उपलब्ध असून सदरचा दर प्र. हेक्टरी वाजवीपेक्षा जादा किंमत दर्शवित असलेने त्याचा विचार केलेला नाही. सन १९९७ साठी मौजे शिराळे येथील जमिनीसाठी १।१।९७ ते ३१।१२।९७ या कालावधीकरता तयार करणेत आलेले सविस्तर स्थानिक मूल्यदर तक्त्यानुसार ग्रुप क्र.४ साठी जिरायत जमिनीचा प्र.हे. दर रु. १२७७५०/- इतका आहे. सदर दर योग्य असलेने मी या ग्रुपचे जमिनीसाठी प्र.हे. १२७७५०/- एक लाख सत्तावीस हजार सातशे पन्नास इतका दर निश्चीत करत आहे.

ग्रुप क्र.५ — ग.नं. $\frac{९४}{१-अ}$ ची संपादनाची जमिन बागायत प्रकारात मोडत असून सदर जमिनीचे मुल्यांकन ठरविणेकामी एकुण अ.नं. ७,८,९, ३ व्यवहार उपलब्ध झाले असून पैकी अ.नं. ८ चा एकच व्यवहार बागायत जमिनीचा असून तोही प्र.हे. अतिशय कमी किंमत दर्शवितो. म्हणून त्याचा विचार केलेला नाही. सन १९९७ चे स्थानिक मुल्यांकन तक्त्यानुसार या जमिनीचे बागायत ग्रुप साठीचा प्र.हे. २०७०००/- दर योग्य असलेबाबत माझे मत झालेने मी या जमिनीसाठी प्र.हे. २०७०००/- दोन लाख सात हजार फक्त प्र.हे. दर निश्चीत करत आहे.

सदरचे दोन्ही दरास मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील क्र.भूसं/आरडीआर/१।३८८।९८ दि. १७।३।९८ चे पत्रान्वये मंजूरी देणेत आलेली आहे.

## मालमत्तेवरील बांधकामाचे मुल्यांकन

| अ. नं. | स. नं. / गट नं. | कब्जेदाराचे नांव | बांधकामाचा मालक | बांधकामाचा प्रकार | ठरवलेली किंमत |
|---|---|---|---|---|---|

**बांधकामाखालील क्षेत्र**

**विहीर**

**पाईप लाईन**

**झाडे**

**ताली**

**तारेचे कुंपन किंवा भिंती**

विच्छेद हानिकारक यथा बंद झालेने माल नाश झालेने उपद्रवामूळे झालेले नुकसान

**इनाम जमीन**

**सविभाजन**

हितसंबंधी इसमाना नुकसान भरपाई रक्कम सविभाजन दाखविणारे पत्रक सोबत जोडले आहे

**संपादनाखालील जमिनीवरील बोजे**

पेमेंटचे वेळी बोजांचा विचार करणेत येईल.

**संपादनाखालील जमिनीवरील कुळें**

**भरपाई भत्ता**

संपादनाखालील जमिनीची येणारी बाजार भावाची रक्कम भरपाई म्हणून दिली जाते. त्यामध्ये झाडे जमीन इमारती व बांधकामे यांचे किंमतीचा समावेश होतो. त्या रकमेवर ३० टक्के भरपाई भत्ता देणेबद्दल भूसंपादन कायदा १८९४ व दुरुस्त कायदा १९८४ कलम २३ (१ अ) व २३ (२) मध्ये तरतूद केली आहे तसेच सदर कायद्यामधील तरतूदीनूसार १२ टक्के विशेष भता म्हणून संपादनाखालील जमिनीचे बाजार मूल्यावर कलम ४ खालील अधिसूचनेच्या

तारखेपासून किंवा संपादनाखालील जमिनीचा कब्जा ज्या तारखेस घेतला आहे त्यापैकी अधिक असेल तेव्हापासून ते जमिनीचा निवाडा त्या तारखेपर्यंत देणेचा आहे.

**कब्जा**

संपादनाखालील जमिनीचा कब्जा भूसंपादन कायद्याचे तरतूदीखाली संपादन मंडळांस दिलेला नाही.

**आगाऊ नुकसान भरपाई**

**मुल्यांकनाचा तपशील**

| | | |
|---|---|---|
| १) जमिनीची किमत | | |
| २) बांधकामाची किमत | रूपये | ७४८८/- |
| ३) विहिरीची किमत | रूपये | — |
| ४) ३० टक्के भरपाई भत्ता | रूपये | — |
| ५) १२ टक्के वार्षिक विशेष भत्ता | रूपये | २२६६/- |
| ६) अस्थापना खर्च | रूपये | ६५१/- |
| | | २२५/- |
| एकूण | रूपये | १०६३०/- |

एकूण रक्कम रूपये दहा हजार सहाशे तीस मात्र.

# निवाडा

मी याव्दारे भूसंपादन कायदा १८९४ व दुरुस्त व दुरुस्त १९८४ कलम ११ अन्वये असे घोषित करतो की,

१) संपादनाखालील जमिनीचे खरे क्षेत्र हे-आर ०-०४ इतके आहें.

२) देय असलेली भरपाई एकूण रक्कम रूपये १०८०५/-
( अक्षरी रूपये दहा हजार आठशे पाच मात्र. )
इतकी आहे.

३) संविभाजन सोबत जोडलेल्या संविभाजन पत्रकाप्रमाणे केंले आहे

संपादनाखालील जमिनी अंतिमरित्या संपादित झाल्या असून, त्यावरील बोजा, हक्क किंवा सत्ता प्रकार कायदेशीर एखादे इसमाचे हक्क असतील, शासनाचे हक्क व्यतिरिक्त विरहित, महाराष्ट्र शासनाचे मालकीच्या झाल्या आहेत.

मा. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील क्र. भूसं/आकार-३८८/९८ दि. २०/३/९८ चे पत्रान्वये सदर निवाड्यास मंजूरी देणेत आली आहे.

ठिकाण-सांगली

दिनांक 13 ४ ९८

विशेष भूमी संपादन अधिकारी
न. ५ सांगली

# निवाडा तक्ता

मौजे शिराळा (कापरी) तहसील शिराळा जिल्हा सांगली येथील संपादित जमिनीतील सर्व हितसंबंधी व्यक्तींना नुकसान भरपाईची माहिती दाखविणारा तक्ता

१) निवाडा तक्त्याचा क्रमांक व दिनांक :- एल.ए. क्र./ एसआर-१२/८७

२) निवाडा दिनांक : १३/७/९८

३) निवाडा जाहीर करणारे :- श्री. व्ही. बी. पवार,
अधिकाऱ्याचे नांव विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.५ सांगली

१) ज्या प्रयोजनासाठी जमिनीचे संपादन केले त्याचे नांव :-

२) ज्या महाराष्ट्र शासन राजपत्रात घोषीत करण्यात आले त्याचा क्रमांक, दिनांक व भाग क्रमांक :-

कलम ४ प्रसिद्धी | कलम ६ प्रसिद्धी

| अ. नं. | ज्यांना निवाड्याप्रमाणे रक्कम अदा करावयाची त्या व्यक्तींची नांवे | गट क्रमांक | संपादित जमिनीचे क्षेत्र हे. आर | संपादित जमिनीचा सारा रु. पैसे | हेक्टरी सरासरी आकार | जमिनीचा प्रकार | प्रति हेक्टरी ठरविण्यात आलेली कि रु. पैसे | जमीन मूल्य रुपये | विहीरीचे मूल्य रुपये | ताली्चे मूल्य रुपये | झाडांचे मूल्य रुपये | इमारत वगैरे बांधकामे मूल्य | एकूण | अॅड. दिला असलेस रक्कम | पेमेंट तारीख | ३० टक्के भरपाई रक्कम रु. पैसे | १२ टक्के रक्कम प्रतिवर्षी दि. ते दि. रु. पैसे | एकूण एकंदर नुकसान भरपाई रु. पैसे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | ग्रुप क्र. ४ | | | | | | | ग्रुप क्र. ४ | | | | | | | | | | |
| | १) होसाबाई पांडुरंग गायकवाड ६६<br>२) आनंदराव हिंदुराव गायकवाड ८२<br>३) हिंदुराव रामू गायकवाड ८२<br>बळवंत लक्ष्मण गायकवाड ८२<br>रामचंद्र लक्ष्मण गायकवाड ८२ | ६६ | ०-०५ | ०-११ | ३-६५ | जि. | २२६५०/- | १२६८/- | — | — | — | — | १२६८/- | — | — | ३८३/- | ११५/- | १७६६/- |
| | ग्रुप क्र. ५ | | | | | | | | ग्रुप क्र. ५ | | | | | | | | | |
| | शारदा प्रकाश नलवडे ५४६<br>प्रताप प्रकाश नलवडे ५४८<br>अशोक प्रकाश नलवडे ५४९<br>शशीकांत प्रकाश नलवडे ६५ | ५४६/अ | ०-०३ | ०-१८ | ५-४२ | बागायत | २०६०००/- | ६२९०/- | — | — | — | — | ६२९०/- | — | — | १८८७/- | ५५६/- | ८७३३/- |
| | एकूण | | ०-०८ | ०-२९ | | | | ७५५८/- | — | — | — | — | ७५५८/- | — | — | २२६६/- | ६७१/- | १०४०५/- |
| | | | | | | | | | | | | | | | | | + अस्थापनाखर्च २२५/- | |
| | | | | | | | | | | | | | | | | | एकूण - १०६३०/- | |

एकूण रक्कम रुपये १०६३०/- दहा हजार सहाशे तीस फक्त,

दि. १३/७/९८ रोजी निवाडा जाहीर केला.

विशेष भूमिसंपादन अधिकारी क्र.५ सांगली